श्री. प्रमोद आनंदराव सावंत, तालुका कृषि अधिकारी, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग व श्री. पांडुरंग एन. दडस, तालुका कृषि अधिकारी, देवगड, जि. सिंधुदुर्ग यांची अकार्यकारी पदावर बदली करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः लोआप्र-२०१७/प्र.क्र.२२२ (१)/५-अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ०५ मार्च, २०१९.

वाचा:- १. शासन आदेश, कृषि व पदुम विभाग, क्र. लोआप्र २०१७/प्र.क्र.२२२/५-अे, दि. २४.१०.२०१८.
२. शासन आदेश, कृषि व पदुम विभाग, क्र. लोआप्र २०१७/प्र.क्र.२२२/५-अे, दि. २४.१०.२०१८.
३. शासन शुध्दीपत्रक, कृषि व पदुम विभाग, क्र. लोआप्र २०१७/प्र.क्र.२२२/५-अे, दि. १२.१२.२०१८.

प्रस्तावना:-

माळशिरस तालुका, जिल्हा सोलापूर येथील राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानाच्या अंमलबजावणीत सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणात दोषी आढळून आलेल्या १६ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. सदर निलंबित अधिकाऱ्यांपैकी श्री. प्रमोद आनंदराव सावंत व श्री. पांडुरंग एन. दडस यांना पुन:स्थापित करतांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कार्यकारी पदावर पदस्थापना देण्यात आली होती. सदर प्रकरणी मा. लोकआयुक्त यांनी या अधिकाऱ्यांना पुनस्थापित करतांना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि. २०.०४.२०१३ मधील तरतुदींस अनुसरून अकार्यकारी पदावर पदस्थापित करण्याबाबत कृषि विभागाने फेरविचार करावा, असे आदेश दिले. त्यानुसार संदर्भाधीन क्र. १ च्या शासन आदेशानुसार श्री. सावंत यांना तंत्र अधिकारी, जि.अ.कृ.अ., रत्नागिरी या अकार्यकारी पदावर व संदर्भाधीन क्र. २ च्या शासन आदेशानुसार व संदर्भाधीन क्र. ३ च्या शुध्दीपत्रकानुसार श्री. दडस यांना तंत्र अधिकारी, जि.अ.कृ.अ., सिंधुदुर्ग या अकार्यकारी पदावर पदस्थापित करण्यात आले होते.

श्री. व्ही. जी. तांबे यांनी त्यांच्या दि. २४.१०.२०१८ च्या शासन आदेशाविरूध्द मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. ९८५/२०१८ दाखल केला. मा. न्यायाधिकरणाने श्री. तांबे यांच्या बदलीचा निर्णय घेतेवेळी बदली अधिनियम-२००५ मधील नियम ४(४)(दोन) व ४(५) च्या तरतुदीनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आलेला नसल्याची बाब न्यायनिर्णयात नमूद करून दि. १८.०१.२०१९ रोजी पुढील अंतरीम आदेश पारीत केले आहेत.

Now, the respondents realized that the impugned orders are not passed after following due procedure contemplated in ROT Act, २००५. They are at liberty to take remedial measures and to pass appropriate orders in accordance to law.

मा. न्यायाधिकरणाच्या उक्त नमूद अंतरीम आदेशानुसार श्री. व्ही.जी. तांबे यांच्यासह इतर ३ अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारसी करण्यासाठी आयुक्त (कृषि) यांच्या अध्यक्षतेखालील नागरी सेवा मंडळ-१(अ) ची चक्रीय पध्दतीने बैठक आयोजित करण्यात आली होती. नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारसीस सक्षम प्राधिकारी (मा. मुख्यमंत्री) यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार श्री. सावंत व श्री. दडस यांचे संदर्भाधीन आदेश रद्द करून खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने विभागातील गट-ब संवर्गातील (ग्रेड वेतन - रू.४६००) अधिकाऱ्यांची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे नांव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१.	श्री. प्रमोद आनंदराव सावंत, तालुका कृषि अधिकारी, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग	तंत्र अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, रत्नागिरी
२	श्री. पांडुरंग एन दडस, तालुका कृषि अधिकारी, देवगड, जि सिंधुदुर्ग	तंत्र अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग

२. उपरोक्त अधिका-याने नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१३३०३९९६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.03.05 13:35:01 +05'30'

(सु. सं. धपाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव.

२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

४. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.

६. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)

७. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे

८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)

९. संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)

१०. निवड नस्ती -१५अे/५-अे.

प्रतिलिपी,

मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.